सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## तारीख ठरली! नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान

### राज्य निवडणूक आयोगाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

राज्य निवडणूक आयोग आयुक्त दिनेश वाघमारेंनी आज (दि. ४ नोव्हेंबर) पत्रकार परिषद घेऊन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला. राज्यातील नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे आता राज्यात राजकीय हालचालींना वेग येणार असून वातावरण तापू लागणार आहे.




राज्यभरातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांबाबत मोठी घडामोड झाली असून न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन नगर परिषद व नगर पंचायत समित्यांच्या निवडणुकांविषयी महत्त्वाची माहिती दिली.

या निवडणुकांमध्ये उमेदवारांसाठी आधुनिक सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांना आता ऑनलाईन नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. संबंधित संकेतस्थळावर नामनिर्देशनाची माहिती भरून, ती आयोगाकडे सादर करता येणार आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

राज्यातील या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३७६ मतदार आहेत. मतदानासाठी १३ हजार ३५५ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.राज्यात एकूण २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायत समित्या यांच्या निवडणुका होणार आहेत. याशिवाय राज्यात एकूण १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगर पंचायतांच्या निवडणुका या टप्प्यात घेण्यात येणार आहेत. नगर परिषद सदस्यांची संख्या प्रत्येक ठिकाणी २० ते ७५ या दरम्यान आहे. प्रत्येक प्रभागातील एक सदस्यासाठी मतदारांना एकच मतदान करावे लागणार आहे.

**ईव्हीएमद्वारे मतदान**

या सर्व नगर परिषद व नगर पंचायत निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन (एतच्) द्वारे घेण्यात येणार आहेत. मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि कार्यक्षम व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने आवश्यक त्या सर्व तयारीस सुरुवात केली आहे.

**निवडणूक कार्यक्रम असा**

१० नोव्हेंबर नाम निर्देशन पत्र दाखल
अंतिम मुदत १७ नोव्हेंबर
छाननी १८ नोव्हेंबर
माघारी २१ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर (अपील)
२६ ला अंतिम यादी जाहीर
मतदान - २ डिसेंबर २०२५
निकाल - ३ डिसेंबर २०२५

## महादेव बेटिंग ॲप प्रकरणातील मुख्य आरोपी दुबईतून बेपत्ता


**विदर्भ प्रजासत्ताक दि.४दुबई**

मागील दोन वर्षापूर्वी महादेव ऑनलाइन बेटिंग घोटाळा समोर आला. या प्रकरणी डिसेंबर २०२३ मध्ये घोटाळ्यातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या रवी उप्पलला दुबईमध्ये अटक करण्यात आली. इंटरपोलने जारी केलेल्या रेड कॉर्नर नोटीसच्या आधारे त्याला भारतात प्रत्यार्पण करण्यात येणार होती, पण प्रत्यार्पण प्रक्रिया प्रलंबित राहिली आणि ४५ दिवसांनंतर रवी याची सुटका करण्यात आली.

यूएईने प्रत्यार्पणासाठी मागितलेली कागदपत्रे वेळेवर प्रदान करण्यात आली नाहीत. ईडीने सर्व आवश्यक कागदपत्रे वेळेवर सादर केली. रवी उप्पल त्याच्या सुटकेनंतरही बारकाईने देखरेखीखाली होता

भारतीय अधिकाऱ्यांना किंवा युएईला त्याच्याबद्दल कोणतीही माहिती नसल्याचे वृत्त आहे. तो बेपत्ता झाला आहे आणि त्याचे प्रत्यार्पण रोखण्यात आले आहे. 'उप्पल युएई सोडून अज्ञात ठिकाणी गेला आहे. रवी उप्पलचा सहकारी सौरभ चंद्राकर अजूनही दुबई अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहे.

वी उप्पलकडे दक्षिण प्रशांत महासागरातील एका बेट राष्ट्र असलेल्या वानुआटुचा पासपोर्ट आहे.




हा तोच देश आहे ज्याचा पासपोर्ट ललित मोदींकडे देखील होता. नंतर वानुआटुने ललित मोदीचा पासपोर्ट रद्द केला आणि म्हटले की प्रत्यार्पण टाळणे हे त्या देशात नागरिकत्व मिळविण्याचे वैध कारण नाही.ऑस्ट्रेलियापासून अंदाजे २००० किमी अंतरावर असलेल्या पोर्ट विला ही वानुआतूची राजधानी आहे. रवी उप्पल आणि सौरभ चंद्राकर, त्यांच्याकडे वानुआतूचे नागरिकत्व देखील आहे, त्यांनी त्यांचे गुन्हेगारी नेटवर्क वाढवण्याच्या उद्देशाने बेटांवर मालमत्ता खरेदी केल्या. २०१८ मध्ये स्थापन झालेले महादेव ॲप दररोज २०० कोटी रुपयांचा नफा कमवत असल्याचा आरोप आहे.

## 'एक गरिबांचा, तर दुसरा श्रीमंतांचा; दोन देश निर्माण केले', राहुल गांधींचा पंतप्रधान मोदींवर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ औरंगाबाद**

बिहार निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी औरंगाबाद (बिहार) येथे झालेल्या सभेतून मोदी सरकारवर तीव्र शब्दात हल्ला केला. त्यांनी आरोप केला की, मोदी सरकारने देशातील सर्व सरकारी संपत्ती काही उद्योगपतींच्या हाती सोपवून 'दोन देश' (एक श्रीमंतांचा आणि दुसरा गरीब, शेतकरी व मजुरांचा) निर्माण केले आहेत.



राहुल गांधी म्हणाले, मोदी सरकारने देशातील सर्व सरकारी कंपन्या विकल्या आहेत. वीज, रेल्वे, बंदरे, विमा योजना...सर्व काही अदानी-अंबानींसारख्या उद्योगपतींना दिले. तुम्ही कितीही शिक्षण घ्या, पण परीक्ष्या दोन दिवस आधी पेपर लीक होतो. सरकारकडे रोजगार निर्माण करण्याची इच्छाच नाही. असे बिहार आम्हाला नको आहे. आज संविधान वाचवले नाही, तर फक्त मोदी-अदानी-अंबानीच उरतील.राहुल गांधी पुढे म्हणाले की, सरकारच्या विमा योजनांचा उपयोग आता शेतकऱ्यांकडून पैसे गोळा करून खाजगी कंपन्यांना देण्यासाठी केला जातो. मोदीजी छठ पूजेत स्वतःसाठी स्वच्छ पाणी मागवतात, पण सामान्य बिहारींना यमुनेच्या दूषित पाण्यात स्नान करावे लागते. हेच त्यांचे लोकशाहीचे तत्त्व आहे. नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीमुळे बिहारच्या युवकांचे रोजगार गेले. आज परिस्थिती अशी आहे की, नोकरी नसल्यामुळे तरुण 'रील्स' बनवत आहेत.

**बिहारचे लोक देशभरात मजूर...**

अमित शाह म्हणतात की बिहारमध्ये उद्योगांसाठी जमीन नाही, पण अदाणींसाठी जमीन नेहमी उपलब्ध असते. हे दुहेरी धोरण आहे. बिहारमधील लोक देशभरात मजूर म्हणून काम करत आहेत. बिहारमधील लोक देशाच्या विविध भागात मोठ्या इमारती, रस्ते, बोगदे आणि कारखाने बांधतात. सत्य हे आहे की नितीश कुमार यांनी येथील रोजगार संपवून बिहारमधील लोकांना मजूर बनवले आहे.

जर तुम्ही देशातील ५०० सर्वात मोठ्या कंपन्यांची यादी केली तर तुम्हाला मागासलेले, सर्वात मागासलेले, दलित, महादलित किंवा आदिवासी समुदायातील लोक सापडणार नाहीत. या कंपन्यांमध्ये काम करणारे लोक १०% लोकसंख्येतून येतात. न्यायव्यवस्था असो किंवा नोकरशाही, त्यांनाच सर्वत्र स्थान मिळते. जर आपण देशाच्या विकासात देशातील ९०% लोकसंख्येला सहभागी करून घेतले नाही, तर आपण असा भारत निर्माण करू, जिथे सर्व संपत्ती फक्त २-३ लोकांच्या हातात असेल, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## दुबार मतदारांच्या नावासमोर 'डबल स्टार' येणार - राज्य निवडणूक आयोग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीआधी मतदार याद्या पारदर्शक करा अशी मागणी विरोधकांकडून सातत्याने होत आहे. त्यात दुबार मतदारावरून विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. त्यावरून राज्य निवडणूक आयोगाने मोठं पाऊल उचललं आहे. राज्यात ज्या मतदार याद्या आहेत त्यात जे संभाव्य दुबार मतदार असतील त्यांच्या नावासमोर डबल स्टार केले जातील. या मतदारांची ओळख पटवली जाईल अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.



राज्य निवडणूक आयोगाने २४६ नगरपरिषदा,४२ नगरपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यावेळी पत्रकार परिषदेत दिनेश वाघमारे म्हणाले की, जिथे संभाव्य दुबार मतदार असतील त्यांच्या नावासमोर डबल स्टार असेल. हा मतदार कुठल्या केंद्रावर मतदान करेल त्याची नोंद केली जाईल. आमच्याकडे एक टूल आहे त्याआधारे संभाव्य मतदारांच्या नावासमोर डबल स्टार करण्यात आले आहेत. दुबार मतदारांपर्यंत राज्य निवडणूक आयोगाचे कर्मचारी पोहचतील. असा मतदार केंद्रावर आल्यानंतर त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेतले जाईल. त्याला एकाच केंद्रावर मतदान करता येईल असं त्यांनी सांगितले.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर**

असे चिन्ह नमूद करण्यात येते. असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत याबाबत त्यांच्याकडून नोंद घेतली जाईल. या आवाहनाला प्रतिसाद मिळाल्यानंतर अशा मतदारांकडून तो कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घेतला जाईल. त्या दुबार मतदाराने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही परंतु प्रतिसाद न मिळाल्यास संभाव्य दुबार नाव असलेला मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे हमीपत्र लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर या मतदाराची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

**मतदारांसाठी नवीन मोबाईल ॲप**

मतदारांना मतदार यादीत नाव शोधणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी नवीन मोबाईल -झझ विकसित केले आहे. मोबाईल ॲप च्या माध्यमातून मतदारांना आपल्या नावाबरोबरच आपले मतदान केंद्रदेखील शोधता येईल. उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत शपथपत्रेही दाखल करावी लागतात. त्यातून मतदारांना उमेदवारांची गुन्हेगारीविषयक पार्श्वभूमी, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिक समजू शकते. ही माहितीसुद्धा या -झझ पमधून मिळू शकेल.

## वेगळा विदर्भ राज्याच्या मागणीला जोर ! आंदोलन समिती १६ डिसेंबरला काढणार लाँग मार्च

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने १६ डिसेंबर २०२५ रोजी शहीद चौकातील विदर्भ चंडिका मंदिरापासून चिटणीस पार्कपर्यंत लाँग मार्च काढण्यात येणार असून, चिटणीस पार्कवर विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप यांनी पत्रकार परिषदेत दिली.




वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या कोअर कमिटीची बैठक सोमवारी अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आली. बैठकीला समितीचे अध्यक्ष माजी आमदार ॲड. वामनराव चटप, महिला अध्यक्ष रंजना मामर्डे, युवा आघाडीचे अध्यक्ष मुकेश मासुरकर व ११ जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत १६ डिसेंबरला लाँग मार्च काढण्याबाबत निर्णय घेण्यात आला. बैठकीत मिशन २०२७ अंतर्गत २०२७ पूर्वी विदर्भ राज्य मिळविण्याचा संकल्प करण्यात आल्याचे ॲड. चटप यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला रंजना मामर्डे, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, मुकेश मासूरकर, अरुण केदार, प्रा. डॉ. पी. आर. राजपूत, सुनील चोखारे, तात्यासाहेब मते, नरेश निमजे, प्रदीप सिरस्कर, प्रवीण राऊत उपस्थित होते.

## सरकारमधील मंत्रीच जातीयवादी विधान करत असेल तर ...

### पवारांची शेलारांचं नाव न घेता टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

राज्यामध्ये एकीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू असताना दुसरीकडे विरोधकांकडून दुबार मतदार नोंदणी तसेच मत चोरीचा आरोप केला जात आहे या दरम्यानच भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी मतसुरीच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांचा परदा फास्ट करत पत्रकार परिषद घेत दुबार मतदारांचे आकडेवारी सांगितले यामध्ये त्यांनी



मुस्लिम मतदाराचा उल्लेख करत वोटची हातचा आरोप केला शरद पवार यांनी जातीयवाद निर्माण केला जात असल्याचे टीका नाव न घेता केले आहे.

त्यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, राज्यात सामाजिक ऐक्य राहील याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. विशेषता सरकारमध्ये जे आहेत. त्यांची जबाबदारी आहे की, राज्यातील सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे. मात्र सरकारमधील एक जेष्ठ मंत्री जर धार्मिक आणि जातीय तेढ वाढवणारे वक्तव्य करत असेल तर ते राज्याच्या दृष्टीने हिताचं नाही. असं म्हणत शरद पवार यांनी मंत्री आशिष शेलार यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला आहे.

## महिला वर्ल्ड कप विजेता संघाचे राज्य सरकारकडून अभिनंदन, खेळाडूंचा होणार सत्कार;मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजसत्ताक दि.४मुंबई**

मुंबईतील डी. वाय. पाटील मैदानावर झालेल्या आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने शानदार कामगिरी करत दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत पहिल्यांदाच विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. तर आता या संघात असणाऱ्या राज्यातील महिला खेळाडूंचा राज्य सरकारकडून सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.




मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मोठी घोषणा करत राज्यातील महिला खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

तर यापूर्वी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील आयसीसी महिला विश्वचषकावर पहिल्यांदाच भारताचे नाव कोरणाऱ्या भारतीय संघाचे अभिनंदन करण्यात आले होते. याबाबतच्या अभिनंदन प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय संघाच्या या घवघवीत यशाबाबत गौरवोद्गार काढले.

## संपादकीय ......

# बिहारमधील रणधुमाळी

अवघ्या देशाचे लक्ष असलेल्या बिहार विधानसभा निवडणुका ६ आणि ११ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांमध्ये होत आहेत. १४ नोव्हेंबरला मतमोजणी असून, त्यावेळी कोणाची हार आणि जीत स्पष्ट होईल. विधानसभेच्या २४३ जागा असून, सरकार स्थापन करण्यासाठी १२३ जागांचे बहुमत आवश्यक आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत 'एनडीए'ने बहुमत मिळवले असले, तरी राष्ट्रीय जनता दल, म्हणजेच लालूप्रसाद यादव यांच्या आरजेडीने ७५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपने ७४. मुख्यमंत्रिपद भूषवत असलेल्या नितीश कुमार यांच्या 'जेडीयू'ला अवघ्या ४३ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसने १९, लोकजनशक्ती पार्टी म्हणजेच 'एलजेपी'ने १ आणि इतरांनी ३१ जागा जिंकल्या होत्या. यावेळी 'एनडीए' पुन्हा एकदा सत्ता स्थापन करू शकते, असा बहुसंख्य जनमत पाहण्यांचा अंदाज असला तरी त्यावरून निकालाचा अंदाज बांधणे कठीण. प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. आरोप-प्रत्यारोपांचा भडिमार सुरू आहे. 'इंडिया' आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून तेजस्वी यादव यांचे नाव जाहीर करायला काँग्रेस पक्ष तयार नव्हता. आरजेडीने त्यांच्या डोक्यावर कट्टा लावल्यानंतर ते तयार झाले, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर आणि विशेषत: काँग्रेसवर तोफ डागली आहे.एका युवराजाने व्होट अधिकार यात्रा काढली, त्यामुळे आपल्या स्थानाला धोका निर्माण झाला आहे, असे 'जंगलराज'च्या युवराजाला वाटले. त्यामुळे आरजेडीने काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या विरोधातच उमेदवार जाहीर केला, असा हल्लाबोल त्यांनी केला आहे. तर बिहारचे डबल इंजिन सरकार दिल्लीतून चालवले जात असून, राज्याची जनता तसेच मुख्यमंत्री नितीश कुमार यांना आदर मिळत नसल्याची टीका काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी केली आहे. लालूप्रसाद यादव मुख्यमंत्री असताना, बिहारमधील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती पूर्णत: बिघडली होतीच; परंतु ताज्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ या नितीश कुमार राजवटीतील राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण ८० टक्क्यांनी वाढले. याच कालावधीत गुन्हेगारीची राष्ट्रीय सरासरी ३२ टक्के वाढ दर्शवणारी होती, असे स्टेट क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे. केवळ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी वा तेजस्वी यादवच नव्हे, तर एलजेपीचे प्रमुख चिराग पासवान हेदेखील वाढत्या गुन्हेगारीवरून नितीश कुमार सरकारला लक्ष्य करत आहेत.बिहारची लोकसंख्या १३ कोटी असून, जवळपास दोन ते तीन कोटी लोक नोकरीधंद्यासाठी स्थलांतरित झाले आहेत. बेकारीचा दर प्रचंड, म्हणजे १०.८ टक्के इतका आहे. बिहार हे देशातील सर्वाधिक गरीब राज्य असून, बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार, देशातील सर्वाधिक वाईट कामगिरी बिहारची आहे. देशातील ९ टक्के लोक बिहारमध्ये राहतात; परंतु जीडीपीमधील त्यांचा वाटा साडेतीन टक्क्यांच्या आसपास आहे. थोडक्यात, सर्वच पक्षांनी बिहारमधील जनतेशी प्रतारणाच केलेली आहे. गेल्यावेळी एनडीए आणि आरजेडी, काँग्रेस व डाव्यांचे महागठबंधन यांच्यात फक्त १२ हजार मतांचा फरक होता. मागच्या वेळी एलजेपीने स्वतंत्रपणे निवडणुका लढवून, नितीश कुमार यांच्या जेडीयूचे उमेदवार धडाधड पाडले होते. यावेळीही नितीश कुमार यांना त्यांची जागा दाखवून देण्यात आली आहे. सत्तेत आल्यास भाजप मुख्यमंत्रिपदावर दावा सांगेल, असे सांगितले जाते. भाजपने २०२० मध्ये ११० जागा लढवल्या होत्या, तर जेडीयूने ११५. यावेळी भाजप व जेडीयू दोघेही १०१-१०१ जागा लढवत आहेत. उलट चिराग पासवान यांच्या पक्षाला अधिक जागा दिल्या आहेत. शिवाय आघाडीत आपली ताकद वाढल्याचे स्पष्ट संकेत भाजपने नितीश कुमार यांना दिलेले दिसतात.'महागठबंधन'मध्येही सर्वकाही आलबेल नाही. काही मतदारसंघांमध्ये या आघाडीचे उमेदवार एकमेकांविरोधात लढणार आहेत. आघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री व मुकेश सहनी यांना उपमुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून जाहीर केले. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी ३८ पैकी ३३ जिल्ह्यांतून 'मताधिकार यात्रा' काढून, कथित मतचोरीबाबत जनजागृती केली. राजद-काँग्रेसने वातावरणनिर्मिती करताच, आयआरसीटीसी हॉटेल घोटाळा प्रकरणात दिल्लीतील न्यायालयाने राबडीदेवी आणि तेजस्वी यादव यांच्यावर फसवणूक, भ्रष्टाचाराचे आरोप निश्चित केले. महागठबंधनमध्ये राजद, काँग्रेस, सीपीआय, सीपीआय (एमएल), सीपी (आयएम), व्हीआयपी, झारखंड मुक्ती मोर्चा, आयआयपी या पक्षांचा समावेश आहे. जागांवरून राजद व काँग्रेस यांच्यात मतभेद असून, काँग्रेसला जास्त जागा हव्या होत्या. महागठबंधनने जाहीरनाम्यात महिलांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, बलात्कार पीडितांना मदत, जमीन सुधारणा, प्रत्येक उपविभागात ओबीसींसाठी वसतिगृह अशी आश्वासने दिली आहेत.

या जाहीरनाम्यावर डाव्यांचा तसेच राहुल गांधी यांचा प्रभाव असल्याचे दिसते. दुहेरी लढतीत निवडणूक रणनीतिकार प्रशांत किशोर यांचा 'जनसुराज पक्ष' हा एक पर्याय म्हणून उतरलेला आहे. तो 'रालोआ'ची की 'महागठबंधन'ची मते कापेल, हे सांगता येणार नाही. गेल्या तीन महिन्यांत नितीश कुमार सरकारने मोफत वीज, सामाजिक सुरक्षितता पेन्शनमध्ये वाढ, बेकारी भत्ता अशा वारेमाप घोषणा केल्या. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवरील भार प्रचंड वाढला. तसेच केंद्र सरकारने बिहारमधील महिलांसाठी प्रत्येकी १० हजार रुपये देण्याची घोषणा करून ती अंमलात आणली. जदयू-भाजप सरकारच्या विरोधातील (अँटिइन्कम्बन्सी) लाट थोपवण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत देशातील झारखंडपासून ते उत्तर प्रदेशपर्यंत अनेक राज्यांचा चेहरामोहरा बदलला; परंतु बिहार अजून जुन्या-पुराण्या वैचारिक जोखंडाखालीच राहिला आहे. धर्मापेक्षा जातीचे राजकारण आजही प्रभावी ठरताना दिसते. जातीपातींमध्ये दुभंगलेला बिहार आधुनिक विकासाचा व औद्योगिकीकरणाचा प्राथमिक टप्पा केव्हा ओलांडणार, हाच खरा चिंतेचा विषय आहे. बिहारवर जो कोण राज्य करेल, हे लवकरच स्पष्ट होईल. निवडणूक मैदानात दोन्ही आघाड्यांचा संघर्ष टिपेला पोहोचला आहे आणि पुन्हा एकदा सर्वसामान्य मतदारच केंद्रस्थानी आहे.




## हिवाळ्यात मुलांचे फ्लू लसीकरण का आवश्यक? जाणून घ्या...

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**


हिवाळ्यात वाढत्या थंडीबरोबरच लहान मुलांना सर्दी, खोकला आणि फ्लू यांसारख्या संसर्गजन्य आजार होण्याचे प्रमाण वाढते. वातावरणातील तापमानात झालेला बदल आणि कमी झालेली प्रतिकारशक्ती यामुळे मुलांना फ्लूचा त्रास लवकर होतो. त्यामुळे हिवाळ्याच्या सुरुवातीला मुलांचे फ्लूचे लसीकरण करणे हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर ठरते.

आता हिवाळ्याची चाहूल लागली असून पालकांनी आपल्या मुलांची नियमित वैद्यकीय तपासणी करून त्यांची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. यात फ्लू लसीकरण मुलांसाठी महत्त्वाचे असून ते वगळू नये. हिवाळ्यात बहुतेकदा मुलांना नाक वाहणे, खोकला व ताप येणे, घसा खवखवणे आणि थकवा अशा समस्या आढळून येतात. हे सामान्य असले, तरी लहान मुलांमध्ये हे बऱ्याचदा गंभीर गुंतागुंतीचे ठरू शकते. कारण, त्यांची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णतः विकसित झालेली नसते. शिवाय, हंगामी इन्फ्लूएंझा किंवा फ्लू हा शाळा आणि खेळाच्या मैदानांतून सहज पसरतो. त्यामुळे उच्चदाब, अंगदुखी आणि कधीकधी न्यूमोनिया किंवा ब्राँकायटिस, श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या गुंतागुंतीचा सामना करावा लागतो. काही मुलांना त्वरित उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागते.फ्लू लस हे मुलांना संसर्गांपासून वाचवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. पाच वर्षांखालील मुले आणि दमा किंवा मधुमेह यासारख्या पूर्व-अस्तित्वातील आजार असलेल्यांना फ्लूशी संबंधित गुंतागुंत होण्याची शक्यता अधिक असते. लसीकरण केवळ मुलाला निरोगी ठेवत नाही, तर कुटुंबातील सदस्यांना आणि वर्गमित्रांना विषाणू पसरण्यापासूनदेखील प्रतिबंधित करते. बरेच पालक लसीकरणाच्या फायद्यांकडे दुर्लक्ष करतात आणि गैरसमजुतींमुळे लसीकरण करत नाहीत. ही लस सुरक्षित असून अपवादात्मक हात दुखणे किंवा थोडा ताप यासारख्या सौम्य प्रतिक्रिया दिसून येतात आणि त्यानंतर दोन दिवसांतच मुलांना बरे वाटू लागते. म्हणूनच हिवाळा सुरू होण्यापूर्वीच मुलांना फ्लू लसीकरण करून सुरक्षित ठेवता येईल.लसीकरणाव्यतिरिक्त पालकांनी मुलांना वैयक्तिक स्वच्छता राखण्यास, नियमित हात धुण्यास, आजारी लोकांशी संपर्क टाळणे आणि फळे आणि हिरव्या भाज्यांनी समृद्ध असा पूरक आहार घेण्यास प्रोत्साहित करावे.

## भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालय ७ नोव्हेंबरला निर्देश जारी करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**





सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांसह, कर्मचारी कुत्र्यांना खायला घालत असून प्रोत्साहन देत आहेत. अशा संस्थांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या धोक्याबाबत ७ नोव्हेंबर रोजी निर्देश जारी करणार असल्याचे सोमवारी (दि.३) सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेले तीन न्यायाधीशांचे विशेष खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत होते. या प्रकरणी विविध राज्यांच्या मुख्य सचिवांनी न्यायालयात वैयक्तिकरित्या हजर राहून खंडपीठाला कळवले की त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. याची दखल घेत, खंडपीठाने म्हटले की सचिवांची वैयक्तिक उपस्थिती यापुढे आवश्यक राहणार नाही. मात्र, न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात काही चूक झाल्यास सचिवांना पुन्हा हजर व्हावे लागेल असा इशारा न्यायालयाने दिला.

सदर प्रकरणात पक्षकार होऊ इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्था २ लाख रुपये आणि श्वानप्रेमींना २५,००० रुपये रक्कम जमा करण्यास न्यायालयाने सांगितले. पीडितांच्या हस्तक्षेप अर्जांना देखील न्यायालयाने परवानगी दिली. परंतु त्यांना असे कोणतेही पैसे जमा करण्याची आवश्यकता नसल्याचे निर्देश खंडपीठाने दिले. या प्रकरणी भारतीय प्राणी कल्याण मंडळाला नोटीस बजावण्यात आली.

## मनसेसोबतच्या युतीच्या निषेधार्थ शिवसेना (यूबीटी) नेते किशोर तिवारी यांनी दिला पक्षाचा राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४यवतमाळ**

महाराष्ट्रातील शिवसेनेचे (यूबीटी) ज्येष्ठ नेते आणि किसान मिशनचे माजी अध्यक्ष किशोर तिवारी यांनी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) सोबत कोणत्याही युतीला विरोध करत आपल्या पक्षाचा राजीनामा दिला आहे. तिवारी यांनी आज युट्यूबवर एक व्हिडिओ प्रसिद्ध करून राजीनामा जाहीर केला. तिवारी म्हणाले की, पक्षाचा लोकसभेतील विजय हिंदी भाषिक आणि मुस्लिम समुदायांच्या पाठिंब्यामुळे झाला आहे आणि मनसेसोबत सामील झाल्याने या व्होट बँकेलाच राग येऊ शकतो.मनसेसोबतच्या युतीला विरोध करणारे शिवसेना (यूबीटी) नेते किशोर तिवारी म्हणाले की, यामुळे हिंदी भाषिक लोकांचा आणि मुस्लिमांचा विश्वास तुटेल आणि हे भाजपचे षड्यंत्र आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे पक्ष आगामी महापालिका निवडणुका एकत्र लढतील. त्यांनी या मुद्द्यावर उद्धव ठाकरेंना पत्र लिहिले असल्याचे उघड केले.

**मनसेशी युती हानिकारक आहे**

तिवारी यांनी स्पष्टपणे सांगितले की मनसेसोबत युती केल्याने शिवसेना (यूबीटी) ला नुकसान होईल. त्यांनी असा युक्तिवाद केला की अलिकडच्या लोकसभा आणि विधानसभा



निवडणुकीत पक्षाला हिंदी भाषिक मतदार आणि मुस्लिम समुदायाकडून लक्षणीय पाठिंबा मिळाला आहे आणि जर मनसेसोबत सामील झाले तर हाच घटक पक्षापासून दूर जाईल. तिवारी यांनी आरोप केला की राज ठाकरे यांच्या मनसेने भूतकाळात बिगर-मराठी आणि मुस्लिम समुदायांविरुद्ध मोहिमा सुरू केल्या आहेत, कधीकधी हिंदी भाषिक लोकांवर हल्ला केला आहे आणि कधीकधी मशिदींमधून होणाऱ्या अजानवरून वाद निर्माण केला आहे.

**राज ठाकरे यांची कोणतीही व्होट बँक नाही: किशोर तिवारी**

किशोर तिवारी यांनी असेही म्हटले की मनसेकडे आता एकही ठोस मतपेढी राहिलेली नाही. ते म्हणाले की ही युती प्रत्यक्षात भाजपची चाल आहे. भाजप शिवसेना (यूबीटी) ला कमकुवत करू इच्छिते आणि मुंबईसह ११ शहरांच्या महानगरपालिकांमध्ये त्यांचा पराभव करू इच्छिते. तिवारी यांनी उद्धव ठाकरे यांना भाजपच्या हातातील बाहुली बनू नका असे आवाहन केले. त्यांचा असा विश्वास आहे की शिवसेनेने (यूबीटी) काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांशी आपले संबंध मजबूत करावेत जेणेकरून एक संयुक्त विरोधी शक्ती भाजपला आव्हान देऊ शकेल. तथापि, उद्धव ठाकरे यांनी तिवारींचा सल्ला नाकारला आणि त्यांना पक्ष सोडण्यास भाग पाडले. किशोर तिवारी यांचा असा विश्वास आहे की भविष्यात ते मोदी सरकारविरुद्ध आयुष्यभर आंदोलन सुरू करतील आणि शेतकरीविरोधी भाजप सरकारांना विरोध करतील.

## पॉर्न व्हिडीओवर बंदी घालण्याच्या याचिकेवर सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**




पॉर्न व्हिडिओवर देशव्यापी बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.३) नकार दिला. ऑनलाइन कंटेंट आणि समाज माध्यमांवरील बंदीमुळे नेपाळमध्ये काय झाले ते पहा, असे निरीक्षण सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी यावेळी नोंदवले.

पॉर्न संकेतस्थळांवर बंदी घालण्यासाठी, अश्लील व्हिडीओ सार्वजनिक ठिकाणी पाहणे मर्यादित करण्यासाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे आवाहन याचिकेत करण्यात आले आहे. डिजिटलायझेशननंतर, शिक्षित असो वा नसो, प्रत्येकाला एका क्लिकवर सर्वकाही उपलब्ध आहे आणि सरकारने स्वतःच अब्जावधी पॉर्न वेबसाइट्सचे अस्तित्व मान्य केले आहे, असे याचिकेत म्हटले आहे. भारतात २० कोटींहून अधिक अश्लील क्लिप्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत, ज्यामध्ये बाल लैंगिक सामग्रीचा समावेश आहे. सरकारने माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६९अ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून अशा सामग्रीला ब्लॉक करावे, अशी विनंती या याचिकेत करण्यात आली आहे.

## दर्यापूर-अकोला मार्गावर दोन मोटरसायकलींमध्ये भीषण धडक

### दोघांचा जागीच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४दर्यापूर**



दर्यापूर ते अकोला मार्गावर आज दुपारी सुमारे १२:३० वाजता ग्राम गोळेगाव फाटा परिसरात दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. चक २७ उइ ८९१९ आणि चक २७ ऊा १७२७ या दोन मोटरसायकलींमध्ये झालेल्या या भीषण अपघातात दोन्ही वाहनचालकांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मृतकांपैकी एकाची ओळख गणेश पांडुरंग राठोड (रा. टाकूनपुरा, दर्यापूर) अशी झाली असून दुसरा मृतक मंगेश जायले (रा. अमरावती) असल्याचे समजते. धडकेची तीव्रता इतकी होती की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

दर्यापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार सुनील वानखडे हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा व पुढील तपास सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट नसले तरी दोन्ही वाहनं वेगात असल्याची माहिती समोर येत आहे.

## आशियातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प महाराष्ट्रात; शेतीसाठी होणार आता अखंडीत वीजपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ कृषि**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




राज्य सरकारने आशियातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प हाती घेतला असून, त्याद्वारे शेती क्षेत्रातील संपूर्ण ऊर्जेची गरज सौरऊर्जेकडे वळविण्याचा उपक्रम राबविला जाणार आहे.

या प्रकल्पातून तब्बल १६ गिगावॅट इतकी वितरित सौरऊर्जा क्षमता निर्माण होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे सांगितले. पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत (धुळे/नंदुरबार) प्रकल्पासाठी हरियाणा येथील जीएससी पीएसपी महा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबरोबर फडणवीस यांच्या उपस्थितीत ८ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार सह्याद्री अतिथीगृहावर करण्यात आला.या प्रसंगी अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, जीएससी पीएसपीचे अध्यक्ष सुमित नंदा, संचालक शुभ नंदा, मुख्य विपणन अधिकारी अनुप भटनागर, उपाध्यक्ष विमल सक्सेना, विकास कुमार पाठक आदी उपस्थित होते. कपूर आणि सुमित नंदा यांनी करारावर स्वाक्षरी केल्या.

**सह्याद्री पर्वतरागांमध्ये अनुकूल स्थिती**

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये उदंचन जलविद्युत प्रकल्प राबवण्यासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्याने महाराष्ट्राला मोठा फायदा मिळणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने ऊर्जा ग्रीड स्थिर ठेवण्यासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्प धोरणालाही वेग देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रीड स्थिरतेसाठी सुमारे १ लाख मेगावॅट क्षमतेची उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. या माध्यमातून महाराष्ट्रच नव्हे तर राष्ट्रीय वीज ग्रीडही स्थिर ठेवण्याची क्षमता निर्माण होईल. दीपक कपूर म्हणाले की, आतापर्यंत ५० उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सामंजस्य करार झाले असून, त्यातून ७० हजार मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी लागणारा वीजपुरवठा सौरऊर्जेवर आधारित होणार असून, त्यामुळे पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**कराराची वैशिष्ट्ये**

१५०० मेगावॅट वीजनिर्मिती
२५०० रोजगार देणार
२८९० कोटी रुपये सरकारला दरवर्षी महसूल मिळणार

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# अमरावती महापालिका क्षेत्रात मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणीचा निर्णय

## आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी केले पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आभार व अभिनंदन


**विदर्भ प्रजासत्ताक दि.अमरावती**

अमरावती शहरांमध्ये भाडे कराराने दिलेल्या इमारतींना महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी करण्यात येत होती. वर्तमान स्थितीत अमरावती महानगर पालिकेच्या वतीने भाडेकरारा संदर्भात इमारतीपासून भाडे करारानुसार प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या सुमारे ५० टक्के उत्पन्न मालमत्ता करापोटी महानगरपालिकेस जमा करावे लागत असे. यामध्ये सुधारणा करून शहरातील मालमत्ताधारकांना सारखाच कर आकारणी करण्यात संदर्भात अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सातत्याने बैठका घेऊन चर्चा केली असता आता महापालिकेच्यावतीने कर आकारणी पद्धतीमध्ये सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आता शहरात मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणी करण्यात येणार असल्याने कमर्शियल टॅक्सधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबद्दल आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

अमरावती महानगर पालिका क्षेत्रात मालमत्ता कर हा किती व कसा लावावा, याबाबत महापालिकेला अधिकार असले तरी कर आकारणी करतांना कुणावर आर्थिक बोजा वाढेल व त्याचा परिणाम शहराचा विकास व गुंतवणुकीवर होणार नाही, याबाबत सुद्धा सुयोग्य नियोजन करणेही,महत्वाचे आहे. घर -इमारती







अथवा जागा अशा मालमत्ता स्वतः वापरा किंवा भाड्याने दिल्या असल्यास त्यांचा मालमत्ताकर सारखाच असला पाहिजे. याबाबत आमदार सौ सुलभाताई खोडके यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.दरम्यान आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना पत्रदेऊन अमरावती महानगर पालिकेतील कमर्शियल टॅक्सधारकांना आकारण्यात येत असलेले सुपर टॅक्स संदर्भात आवश्यक सुधारणा करण्याबाबतची मागणी केली होती. सोलापूर, नाशिक महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर मध्ये सुद्धा सारखाच कर आकाराला जात असल्याचे आमदार महोदयांनी पत्रातून ना. अजितदादा पवार यांना अवगत केले. त्यानुसार अमरावती महानगर पालिकेला सुद्धा सर्व कायदेशीर बाजू तपासून भाडेधारकासंदर्भातील कर आकारणी संदर्भात निर्णय घेऊन शहरातील मालमत्तांधारकांना सारखाच टॅक्स आकारण्याबाबत ना.अजितदादा पवार यांनी देखील निर्देशित केले होते. . अशातच मागील २६ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मनपात आढावा बैठक संपन्न झाली असता कमर्शियल टॅक्स वसुलीस संदर्भात आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मुद्दा उपस्थित करून गांभीर्याने चर्चा केली. अमरावती महानगरपालिकेचा मालमत्ता कर हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. महापालिकेने अनेक मालमत्ता या कराच्या कक्षेमध्ये आणाल्या ही चांगली बाब असली तरीही मालमत्ता कर आकारणी व वसुली प्रणाली अधिक सुलभ करणे महत्वाचे आहे. अमरावती शहरांमध्ये भाडे कराराने दिलेल्या इमारतींना महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी करण्यात येत असून त्यांना सुमारे ५० टक्के उत्पन्न मालमत्ता करापोटी महानगरपालिकेस जमा करावे लागत आहे. याचा परिमाण शहराच्या गुंतवणुकीवर झाल्याने यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले होते. यावर पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे व यांनी मनपा आयुक्तांना त्याबाबत कार्यवाहीच्या सूचना देखील केल्यात.तदनंतर आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मागील १० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या बैठकीतही मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्यासोबत झालेल्या बैठकीतही मुद्दा मांडून शहरातील कमर्शियल टॅक्सधारकांना दिलासा देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना केली.

त्यानुसार आता अमरावती महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांनी कर मूल्य निर्धारण संदर्भातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन महापालिकेच्या अधिनियम व तरतुदीनुसार तसेच सर्व कायदेशीर बाबी तपासून कर आकारणी प्रणाली सुलभ करण्याबाबत निर्णय घेतला. त्यानुसार कर आकारणी पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली असून मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणी करण्यात येणार आहे. व यामुळे शहरातील मालमत्ता धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

याबद्दल आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

# धुक्यांमुळे अमरावती-मुंबई विमानसेवा रद्द कोणतीही पूर्व सूचना न दिल्याने प्रवासी संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**




गेल्या २६ ऑक्टोबरपासून मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवेच्या वेळेत झालेल्या बदलाचे प्रवाशांनी स्वागत केले असतानाच सोमवारी (दि. ३) अमरावती विमानतळावरील विमानसेवेला फटका बसला. बेलोरा येथील विमानतळावरून सकाळी ९.१५ वाजता होणारे उड्डाण रद्द करण्यात आले. यामुळे प्रवाशांचे चांगलेच हाल झाले. त्यातच विमान कंपनीकडून विमान रद्द करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात न आल्याने प्रवासी संतप्त झाले होते.अमरावतीच्या विमानतळावर धुक्यांमुळे दृश्यमानता कमी झाल्याने विमानसेवा रद्द करण्यात आल्याचे विमानतळ व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे. अलायन्स एअर कंपनीच्या मुंबई-अमरावती-मुंबई या विमानसेवेच्या वेळेत बदल झाल्यानंतर विमानसेवा रद्द होण्याचाहा पहिलाच प्रसंग असला, तरी त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.अमरावती-मुंबई विमानसेवेच्या वेळेत गेल्या २६ ऑक्टोबरपासून बदल करण्यात आला आहे. ही विमानसेवा आता आठवड्यातून चार दिवस सुरू करण्यात आली आहे. दर रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी सकाळी ७.३० । वाजता विमान मुंबईहून उड्डाण घेते । आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहोचते. त्यानंतर परतीचे विमान सकाळी ९.१५ वाजता मुंबईकडे झेपावते आणि सकाळी १०.३० वाजता मुंबई विमानतळावर पोहचते. ही विमानसेवा आधी सध्याकाळी होती. ही वेळ दिवसभराच्या कामासाठी मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसाठी गैरसोयीची असल्याने विमानाच्या वेळेत बदल करण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती. त्यामुळे विमान कंपनीने विमानसेवेच्या वेळेत बदल केला. त्याचे प्रवाशांनी स्वागत केले आणि या विमानसेवेला प्रतिसाद देखील मिळाला. पण, आज सोमवारी सकाळी अमरावतीकडे निघालेले प्रवासी हे मुंबई विमानतळावर पोहचले, तेव्हा त्यांना अचानक विमान रद्द झाल्याची माहिती मिळाली. त्याचवेळी अमरावतीहून मुंबईसाठी जाणाऱ्या प्रवाशांनाही अगदी वेळेवर विमान रद्द झाल्याची सूचना मिळाल्याने गोंधळ उडाला. सकाळी अमरावती विमानतळावर धुक्यांमुळे दृश्यमानता कमी असल्यामुळे विमान उतरण्याची शक्यता नसल्याने मुंबईहून येणारे विमान रद्द करण्यात आले. विमान उशिरा आले असते, तर विमानाची इतर उड्डाणे रद्द करावी लागली असती. त्यामुळे अमरावतीकडे हे विमान झेपावलेच नाही, अशी माहिती विमानतळ व्यवस्थापनाकडून देण्यात आली. या गोंधळात अमरावतीच्या प्रवाशांना आल्या पावली विमानतळावरून परतावे लागले. विमान ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने आठवड्याच्या पहिल्या दिवशी मुंबईतील कामांचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना त्याचा मोठा फटका बसला. अनेक प्रवाशांना आता मुंबईला पोहचण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. रेल्वेचे तिकीट ऐनवेळी मिळणे शक्य नसल्याने खासगी वाहनातून प्रवास करण्याखेरीज त्यांना पर्याय उरलेला नाही.

# कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांचा राडा

## शासकीय मदतीसह विमा परतावा द्या-काँग्रेसच्या नेतृत्वात शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४तिवसा**



सततच्या पावसामुळे तालुक्यातील सोयाबिन उत्पादक शेतकरी चागलाच आर्थिक संकटात सापडला असून,सोयाबिन पीक हे पूर्णपणे उध्वस्त झाल्यामुळे सोयाबिन पेरणी व काढणीचा खर्चही निघू शकला नाही,त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी आज तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडक देत चांगलाच राडा केला,अस्मानी संकटामुळे सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांवर आपल्या उभ्यापिकावरच ट्रॅकर चालविण्याची वेळ आल्यामुळे शेतकरी चांगलाच आर्थिक विवंचनेत असून पूर्ताच हतबल झाला आहे,सरकार कडून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच आर्थिक मदत देण्याचे जाहीर करण्यात आले होते,परंतु सरकार शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक मदत देण्यात अपयशी ठरल्यामुळे अन्नदात्याची दिवाळी पुन्हा एकदा अंधारातच गेली आहे,त्यामुळे सरकारचे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतदेण्याचे आश्वासन हवेतच विरल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी कृषी कार्यालयाच्या विहिरीवर बसून सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत,आपला संताप व्यक्त केला,खरिपातील सोयाबीन कापणीचा हंगाम संपून महिना उलटला असून रब्बीच्या पेरणीपूर्व तयारीला सुरवात झाली,परंतु अद्यापही शासन किंव्हा प्रशासनाकडून सोयाबिन पिकांचा विमा परतावा मिळण्यासंदर्भात कुठल्याच प्रकारच्या अधिकृत सूचना नसल्यामुळे विमाधारक शेतकरी संभ्रमात आहे,सरकारने यावर्षी एक रुपयात विमा पॉलिसी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भृदंड सहन करून आपल्या पिकांचा विमा नगदी स्वरूपात उतरावा लागला,मात्र खरिपातील सोयाबिन पीक हे पूर्णपने उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले,परंतु सरकारकडून विमा परतावा मिळण्यासंदर्भात कसल्यास प्रकारच्या अधिकृत सूचना नसल्यामुळे विमाधारक शेतकरी संभ्रमात आहे,त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात आक्रमक शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ठिय्या देत चांगलाच राडा केला व शासकीय मदतीसह विमा परतावा देण्याची मागणी केली होती,यावेळी कृषीभागाची मात्र चांगलीच कोंडी झाली होती,रब्बीच्या हंगामाला सुरवात झाल्यामुळे सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या मदतीसह विमाधारक शेतकऱ्यांना आपल्या पिकाचा विमा परतावा येत्या पंधरा दिवसाच्या आता देण्यात यावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली,अन्यथा तालुका कृषी कार्यालयाच्या विहरीत उतरून आंदोलन करण्याचाइशारा आक्रमक शेतकऱ्यांनी प्रशासनास दिला,यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुकुंद पूनसे,दीपक देशमुख,सुभाषराव ढगे,किशोर गोरडे,प्रतापराव खैरकार,संदीप ढोक,कैलास ढोक,निलेश पूनसे,रवी जवंजाळ,रामचंद्र मनोहरे,विनोद मोंढे,योगेश भगत,शंकरराव होले,उमेश इंगोले,काशिनाथ पाटील, राजुभाऊ कोल्हे,पुरोशोत्तम गोरडे,धनराज अढाऊ,नारायणराव वानखडे,मनीष गाडगे,पंकज कडू, जा लाधे,बबलू इंगोले,जीवन उंद्रे,सुरेंद्र जवंजाळ, हिंमतराव पुनसे,निवृत्ती मोकद्दम,मंगेश ढोक,राधेश्याम महात्मे,विनोद मसलदी,पंकज कळंबे,महेश थोटे,आशिष ढोरे,वैभव सरोदे,ओम घुरडे,सूरज पांडे,तेजस तालन,संदीप थोटे,राहुल लवनकर,विजय पूनसे,रामभाऊ कडू,दिनेश राऊत,अजाब सरोदे,,विलास मसलदीं,हर्षल ढगे,मंगेश पूनसे, भैसराज मसलदी,शकर ढोक गोलू शिंदे यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते,

### पिकल किलो मध्ये,अहवाल मात्र किंट्टल मध्ये

सततच्या पावसामुळे सोयाबिन पीक हे पूर्णपणे उध्वस्त झाले असून सोयाबिन उत्पादक शेतकरी चांगलाच आर्थिक संकटात सापडला,पिकलं किलो मध्ये,अहवाल मात्र किंट्टल मध्ये हे वास्तव कृषी विभागाच आहे,मोठ्या थाटामाठात जाहीर केलेली आर्थिक मदत दिवाळीपूर्वी अन्नदात्याला न देणे हे सरकारच अपयश आहे,विमा परताव्यां संदर्भात प्रशासन गप्प आहे,त्यामुळे सरकार पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या घामाच्या दामावर डल्ला मारण्याच्या प्रयत्नात आहे.!

**मुकूंद बा. पूनसे सामजिक कार्यकर्ता तिवसा**

# अमरावतीतील वाहतूक विभागाचे तीन झोनमध्ये विभाजन थंड बस्त्यात

## पाच महिन्यांपूर्वी तत्काळ अंमलबजावणीचे आदेश झाले होते जारी - आजवर कृती शून्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने सुमारे पाच महिन्यांपूर्वी वाहतूक विभागाचे तीन झोनमध्ये विभाजन करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडे पाठविला होता.

या प्रस्तावास डीजीपी कार्यालयाने मंजुरी दिल्यानंतर पोलीस आयुक्तांनी संबंधित आदेश तत्काळ अंमलात आणावेत, असे निर्देश वाहतूक विभागाला दिले होते. तथापि, प्रत्यक्षात आजवर या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडीत अडकणाऱ्या वाहनचालकांमध्ये विभागाच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

**तीन झोनचे नियोजन अमल शून्य**

आयुक्तालयीन सूत्रांनुसार, अमरावती शहर वाहतूक शाखेला राजापेठ झोन, बडनेरा झोन आणि नागपुरी गेट झोन अशा तीन भागांत विभागण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र पोलीस निरीक्षक नेमण्याचे आणि त्या झोनमध्ये सरासरी ३५ ते ३७ वाहतूक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे नियोजन होते.निरीक्षकाने स्वतः उपस्थित राहून कर्मचाऱ्यांची हजेरी घेणे आणि क्षेत्रीय कारवाईवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. मात्र, पाच महिने उलटून गेले तरी कोणत्याही झोनमध्ये निरीक्षकांची नेमणूक झाली नाही, तसेच हजेरी आणि नियंत्रणाची प्रक्रिया थांबलेली आहे. परिणामी वाहतूक व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत.

**उत्तरदायित्व कोणाचे?**

या संपूर्ण प्रकरणावर अद्याप कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याने अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. नागरिक आणि वाहतूक विभागातील कर्मचारी तत्काळ अंमलबजावणीची मागणी करत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासंदर्भात वाहतूक उपआयुक्त संजय खटाले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी फोन स्वीकारला नाही. दरम्यान, शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून प्रमुख चौकांवर दररोज लांबच लांब रांगा लागत आहेत.परिणामी अमरावती कर जनतेस नाहक त्रास व मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# अमरावती जिल्ह्यात स्क्रब टायफसचे पाच रुग्ण पॉझिटिव्ह

## आरोग्य यंत्रणा निद्रस्त, नागरिकांनी काळजी घेण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**





अमरावती जिल्ह्यात सध्या तब्बल पाच रुग्ण स्क्रब टायफस या जिवाणूजन्य आजाराने ग्रस्त आहेत. स्क्रब टायफस जीवाणूमुळे होणारा एक संसर्गजन्य आजार आहे, जो संक्रमित चिगर चावल्याने पसरतो. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील टीरलिंग पवार या शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.. तर याच आजाराने पवार यांची मुलगी राशीसुद्धा पॉझिटिव्ह आली असून ती सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत आहे.. मात्र यावर जिल्हा आरोग्य प्रशासन अद्यापही सतर्क झाल्याचे दिसून येत नसल्याचे पवार यांच्या नातेवाईकांनी संतप्त प्रतिक्रियेतून आपली भावना व्यक्त केली.

दरम्यान अमरावती जिल्ह्यातील वरुड येथील दीपक बंडे यांचाही अहवाल पॉसिटीव्ह आला. उत्तर प्रदेशातीलआझमगड येथून संजय रामनारायण मौर्य नावाचा व्यक्ती काही कामानिमित्त अमरावतीत आला होता त्याचासुद्धा अहवाल पॉझिटीव्ह आला. एक तर चांदूर बाजार तालुक्यातील अरुण नारायण अंबुलकर यांचासुद्धा अहवाल पॉसिटीव्ह आला. तसेच पुसदा पीएचसीमधून आदी वाघमारे नावाच्या वर्षीय १५ बालकालासुद्धा स्क्रब टायफस झाल्याचे अहवालात नमूद आहे.प्रथम याबाबत जिल्हा आरोग्य प्रशासनाने माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली.. यावर प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आमचे प्रतिनिधी जिल्हा परिषद कार्यालयातील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सुरेश असोले यांच्या कार्यालयात जाऊनसंपर्क साधला असता त्यांची मिटिंग असल्यामुळे ते तब्बल सायंकाळपर्यंत भेटू शकले नाही.. त्यांना अखेर फोन केला असता त्यांनी अखेर स्क्रब टायफसबद्दल माहिती दिली. किडा चावल्यानंतर प्रचंड ताप डोकेदुखी, खोकला असतानासुद्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असलेल्या युवतीची आई' उपचार करा, मुलगी डॉक्टरला असल्याने रुग्णालय प्रशासन या रोगाबाबत बेजबाबदारपणे वागत आहे ते दिसून येत आहे.. अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी स्वतः च स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा स्क्रब टायफस आजाराला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे.

# हल्यांच्या निषेधार्थ बार कौन्सीलचा निर्णय वकिलांनी लाल फिती लावून कामकाजात सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**



महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सीलने वकिलांवरील वाढत्या हल्यांचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या घटनांचा निषेध म्हणून सोमवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यभरातील वकिलांनी न्यायालयात लाल फिती लावून कामकाजात सहभाग नोंदवला.

या आंदोलनाद्वारे वकिलांनी वकील संरक्षण विधेयकाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. बार कौन्सीलने हा निर्णय २९ ऑक्टोबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घेतला. अलीकडेच शेवगाव येथे झालेल्या घटनेत एका वकिलावर उलट तपासणीदरम्यान विचारलेल्या प्रश्नावरून काही व्यक्तींनी प्राणघातक हल्ला केला होता. या घटनेमुळे वकील वर्गात संतापाची लाट उसळली आहे.


बार कौन्सीलच्या निवेदनानुसार, वकील संरक्षण कायद्याचा मसुदा आधीच राज्यभरातील विविध बार असोसिएशनकडे पाठविण्यात आला असून, प्राप्त झालेल्या सूचनांच्या आधारे सुधारित मसुदा ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. शासनाचे लक्ष वारंवार वेधूनही ठोस पावले उचलली गेली नसल्याने बार कौन्सीलने आता कठोर भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सीलचे सचिव ॲड. शरद बागुल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

अमरावती जिल्ह्यातही वकिलांनी लाल फिती लावून कामकाजात सहभाग घेतला. राज्य सरकारने आगामी हिवाळी अधिवेशनात वकील संरक्षण कायदा पारित करावा, अशी मागणी अमरावती जिल्हा वकील संघाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात अमरावती जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे आणि विद्यमान उपाध्यक्ष ॲड. आशिष लांडे यांनी शासनाकडे त्वरेने कार्यवाहीची मागणी केली.


# दैनिक विदर्भ प्रजासत्ताकचा दिवाळी विशेषांक

## वाचकांसाठी ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दीपोत्सव












**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ अमरावती**

सणासुदीच्या वातावरणात यंदा ‘दैनिक विदर्भ प्रजासत्ताक’चा पहिला दिवाळी विशेषांक वाचकांसाठी वाचनाचा एक अनोखा उत्सव ठरत आहे. चोखंदळ वाचकांच्या अभिरुचीनुसार साकारलेला हा विशेषांक केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, बदलत्या जगण्याचे भान देणारा आणि समाजमनात विचारांचे नवीन दिवे प्रज्वलित करणारा ठरत आहे.या विशेषांकात राज्यभरातील ख्यातनाम साहित्यिक, कवी, विचारवंत आणि युवा लेखकराज यांच्या लेखनाचा समृद्ध संगम वाचकांना अनुभवायला मिळत आहे. सामाजिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञान, ग्रामीण आणि शहरी जीवनातील बदल या विविध अंगांचा वेध घेणारे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यासोबतच भावनांना साद घालणाऱ्या कविता, हृदयाला भिडणाऱ्या कथा आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांवरील लेख या अंकाचे वैशिष्ट्य ठरत आहेत.‘दैनिक विदर्भ प्रजासत्ताक’चा हा पहिला दिवाळी विशेषांक असून संपादकीय मंडळाने त्यासाठी केलेल्या परिश्रमांची झलक प्रत्येक पानावर दिसून येते. आकर्षक मांडणी, सुंदर छायाचित्रे आणि सुसंस्कृत भाषाशैलीमुळे अंकाला वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.वाचकांना विचारप्रवर्तक आणि मनस्पर्शी लेखनाचा दीपोत्सव देण्याचा उद्देश या विशेषांकामागे आहे. बदलत्या जीवनशैलीत साहित्यिक मूल्यांचे संवर्धन आणि समाजात सकारात्मकता रुजविण्याचे कार्य ‘दैनिक विदर्भ प्रजासत्ताक’चा हा प्रयत्न नक्कीच पुढे नेईल, असा विश्वास वाचकवर्गातून व्यक्त केला जात आहे.या विशेषांकाद्वारे विदर्भातील साहित्यविश्वाला नवसंजीवनी मिळत असून, परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधणारा हा अंक वाचकांच्या मनात दीर्घकाळ झळकणार आहे.

## हिवाळी अधिवेशन नागपुरातच होणार, कंत्राटदारांना थकबाकी मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमुळे हिवाळी अधिवेशन मुंबईत होण्याच्या चर्चांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुर्णविराम लावला आहे. कंत्राटदारांनी कामे सुरू ठेवावीत. त्यांचे पैसे लवकरच दिले जाईल. नागपुरातच हिवाळी अधिवेशन होणार असून त्यासाठी सर्व तयारी सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपुरात ते सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते.




यावेळी बावनकुळे यांनी महाविकासआघाडीवर टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे यांचा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर ते केवळ कारणे शोधत आहेत. त्यांच्या खासदारांनी सुद्धा चुकीच्या मतदार यादीवरून निवडणूक जिंकली, ते मतचोरी करून जिंकले. आता मात्र भाजपवर टीका करत आहेत. अशीच जर मानसिकता त्यांनी कायम ठेवली, तर पुढील २५ वर्ष महाविकास आघाडी पुन्हा सत्तेत येऊ शकणार नाही असे बावनकुळे म्हणाले.

मतदार यादीतील अनियमिततेबाबत राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलारांचे म्हणो पूर्णपणे बरोबर आहे. राहुल गांधीचे, काँग्रेसचे लांगुलचालन करणारे खरे महाराष्ट्राचे पप्पू कोण हे सर्वांना माहित आहे. कामठी, मालेगाव आणि सिल्लोड या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुबार आणि तिबार मतदार आहेत, काही ठिकाणी चार-चार, पाच-पाच नावे एका कुटुंबात आहेत, असा दावा बावनकुळे यांनी केला. कामठीत सुमारे आठ हजार, सिल्लोडमध्ये ८९०, आणि मालेगावात सुमारे १३० मतदारांची नावे दुबार आहेत. या संदर्भात आम्ही यापूर्वीच निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे, असे त्यांनी सांगितले.

नरखेड येथील व्हायरल ऑडिओ संदर्भात चौकशी २४ तासांत होईल. यामध्ये जर कोणी दोषी आढळला तर कठोर कारवाई केली जाईल. पीक विम्यासाठी २ ते ५ रुपयांचे चेक दिल्याच्या माहितीची चाचपणी होत आहे. जुने चेक दाखवून भ्रामक माहिती देण्यात आली का, हेही तपासले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

**मंत्र्यांसाठी दोन नवे टॉवर उभारण्याचा विचार**

नागपुरातील अनेक सरकारी बंगले जुने झाले आहेत. त्यामुळे वारंवार दुरुस्तीसाठी उधळपट्टी होते. नागपुरात मंत्री व अधिकाऱ्यांसाठी दोन नवीन टॉवर उभारण्याचा विचार आहे. हेरिटेज नसलेल्या जागी हाय-राईज टॉवर उभारण्याची योजना आहे. रवी भवन नागपूरबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांकडे प्रेझेंटेशन सादर करू, असे बावनकुळे यांनी सांगितले.

## सिंधी समाजाच्या ईष्ट देवता झूलेलाल साईंचा अपमान करणाऱ्या अमित बघेलवर कठोर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**




रायपूर येथील अमित बघेल नावाच्या व्यक्तीने सिंधी समाजाच्या ईष्ट देवता भगवान झूलेलाल साई व भगवान अग्रसेन यांचा अवमान करत अशोभनीय भाषा वापरल्याने देशभरातील सिंधी समाजात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अमित बघेलने सिंधी समाजाला पाकिस्तानी सिंधी असे संबोधून समाजाची भावनाच नव्हे तर समाजात द्वेष पसरवण्याचे आणि सामाजिक सौहार्द बिघडवण्याचे षड्यंत्र रचल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ देशभरातील विविध ठिकाणी अमित बघेलविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले आहेत, मात्र अद्याप प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. सिंधी समाजाच्या वतीने पंतप्रधानांना पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे की, अमित बघेलला तत्काळ अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात कोणताही व्यक्ती आपल्या राजकीय फायद्यासाठी कोणत्याही धर्माच्या देवतेचा अपमान करण्याचे धाडस करणार नाही.सिंधी समाजाचा नेहमीच राष्ट्रहिताच्या कार्यात सहभाग राहिला आहे आणि तो शांततेत जीवन जगतो. अशा परिस्थितीत ईष्ट देवतेचा घोर अपमान हा समाजाच्या भावना दुखावणारा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने कारवाई करून सिंधी समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी आज जिल्हाधिकारी यांच्या कडे निवेदनातून करण्यात आली.

## कोंडेश्वरच्या निसर्गरम्य कुशीत उभं राहणार बोधिभूमी आध्यात्मिक-सांस्कृतिक संकुल

### आ. रवि राणा यांच्या पुढाकाराने बडनेरा मतदारसंघात पर्यटन विकासाचा नवा अध्याय सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन विकासाला नवी ओळख देणारा एक भव्य प्रकल्प लवकरच साकार होणार आहे. आमदार रवि राणा यांच्या प्रयत्नातून कोंडेश्वरच्या निसर्गरम्य कुशीत १० एकर जागेवर बोधिभूमी आध्यात्मिक-सांस्कृतिक संकुल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे बडनेरा विधानसभा मतदारसंघात आणखी एक मोठ्या पर्यटन विकास प्रकल्पाची भर पडणार आहे.या संकुलात तथागत गौतम बुद्धांची ५१ फूट उंच भव्य मूर्ती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, बोधिभूमी संस्कार केंद्र / विपश्यना केंद्र, संविधान भवन, ५०० विद्यार्थ्यांसाठी निवासी अभ्यासिका, तसेच महामानवांची आर्ट गॅलरी आणि रिसर्च सेंटर यांचा समावेश असणार आहे.कोंडेश्वर परिसर निसर्गाच्या कुशीत वसलेला असून, हिरवीगार वनराई आणि शांत वातावरणामुळे तो आधीच पर्यटन व अध्यात्मिक साधनेसाठी प्रसिद्ध आहे. या पार्श्वभूमीवर बोधिभूमी संकुल उभारल्याने येथे पर्यटकांचा ओघ वाढेल, तसेच स्थानिक रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल.आमदार रवि राणा यांनी सांगितले की, बोधिभूमी हे केवळ वास्तूंचं संकुल नसून समता, शांतता, करूणा आणि संविधानिक मूल्यांचा संदेश देणारे प्रेरणास्थळ असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांच्या विचारांचे प्रत्यक्ष दर्शन घडविणारे हे संकुल भविष्यातील पिढ्यांना मार्गदर्शन करेल.अमरावती जिल्ह्याच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पर्यटन क्षेत्रासाठी हे संकुल बडनेराची नविन ओळख ठरणार आहे.



## नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती येथे खासदार डॉ. अनिल बोंडे यांची सदिच्छा भेट

### शिक्षक व विद्यार्थिनींसोबत साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ आणि महिला महाविद्यालय, अमरावती येथे नुकतीच माननीय खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी सदिच्छा भेट देत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींच्या समस्या जाणून घेतल्या. या प्रसंगी प्रा. डॉ. संगीता शिंदे, अध्यक्ष - शिक्षक संघर्ष संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. सुभाष कसबेकर यांनी भूषविले, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. निनाद सोमन, प्रा. हितेश व्यास, प्रा. अतुल बिजागरे आणि महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अरुणा वाडेकर उपस्थित होत्या. प्राचार्या डॉ. वाडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि डॉ. बोंडे यांच्या कार्यशैलीवर प्रकाश टाकला.आपल्या मनोगतात डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, दादासाहेब खापर्डे यांनी स्थापन केलेले नूतन विदर्भ शिक्षण मंडळ हे अमरावतीतील प्रतिष्ठित शैक्षणिक केंद्र आहे. माझ्या आईचे शिक्षण नूतन कन्या शाळेत तर माझे प्राथमिक शिक्षण न्यू हायस्कूल बेलपुरा येथे झाले. या संस्थेशी माझे जिव्हाळ्याचे नाते आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी ‘खासदार आपल्या भेटीला व शिक्षक मार्गदर्शन’ या कार्यक्रमाचे कौतुक करून अशा संवादात्मक उपक्रमांची गरज प्रत्येक शैक्षणिक संस्थेत असल्याचे मत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. सुभाष कसबेकर यांनी डॉ. बोंडे आणि डॉ. शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण गुल्हाने यांनी केले. या कार्यक्रमा निमित्य महाविद्यालयातील गठित समितीच्या प्रमुख प्रा.भावना वासनिक,डॉ. विजय वर्डीकर, डॉ पल्लवी अंभोरे, डॉ.अंकुश गिरी, प्रा.सचिन देशमुख,प्रा.ममता पांडे प्रा.माधुरी सोनपरोते ,,प्रा. अपर्णा तीनखेडे, तसेच महिला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, नूतन कन्या शाळा, न्यू हायस्कूल मेन, न्यू हायस्कूल बेलपुरा येथील सर्व शिक्षक वृंद ,शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत